'मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन'ची लघुमाला.

सत्यान्नास्ति परो धर्मः

# मृत्यूबद्दलचें दुःख व मरणोत्तर वस्तुस्थिति
अर्थात्
# मृतासाठीं शोक करणाऱ्या माणसांस
# चार शब्द.

लेखक
सी. डब्ल्यु. लेडबीटर.

प्रकाशक
प्रो० राजाराम सखाराम भागवत, एम्. ए.

सन १९२५.

किंमत २ आणे.

पुणें येथें

'आर्यभूषण' छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें

व

**राजाराम सखाराम भागवत**, एम्. ए., चिटणीस, मराठी थिऑसॉफिकल

फेडरेशन, ३२१ शनवार पेठ, पुणें येथें प्रसिद्ध केलें.

# मृत्यूबद्दलचें दुःख व मरणोत्तर वस्तुस्थिति
## अर्थात्
# मृतांसाठीं शोक करणाऱ्या माणसांस चार शब्द

( लेखक — सी. डब्ल्यू. लेडबीटर )

न त्वम् शोचितुमर्हसि। —गीता.

मित्रा, तुझें ज्याच्यावर प्रेम होतें असें माणूस मृत्यु पावल्यामुळें तूं दुःखसागरांत बुडालेला आहेस. तुला जी व्यक्ति जीव कीं प्राण होती ती नाहींशी झाल्यामुळें तुला हें जग स्मशानवत् झालें आहे. मी आतां जगण्यांत अर्थ काय असें तूं विचारूं लागला आहेस. तुला सर्व जग ओकें ओकें वाटत आहे. आपलें सुख अतःपर संपलें अशी तुझी भावना झाल्यामुळें आपला बाकीचा जन्म सारा दुःखांत जाणार अशी तूं समजूत करून घेतली आहेस. त्या मृत्युमुखीं पडलेल्या माणसाची व माझी कधीं भेट होईल ! ती व्यक्ति माझ्या कधीं दृष्टीस पडेल ! तिच्या तोंडचा एकादा शब्द तरी मला कधीं ऐकावयास मिळेल ! असें तुला झालें आहे. मित्रा, या तुझ्या दुःखानें तूं मुख्यतः स्वतःचाच विचार करीत आहेस. पण तें मेलेलें माणूस आतां कोठें गेलें असेल, त्याची स्थिति कशी असेल याविषयींही तुझ्या मनांत सर्व अंधेर आहे व त्यामुळें तुझ्या दुःखांत आणखीच भर पडलेली आहे.

---

१ सी. डब्ल्यू. लेडबीटरकृत To Those who Mourn या इंग्रजी लेखावरून प्रस्तुत लेख रा. रा. **गंगाधर गोविंद कयाळ** यांनीं मराठींत उतरलेला आहे. मृत्यूविषयीं दुःख करीत असलेल्या माणसांकरितां हा लेख मुद्दाम लिहिण्यांत आलेला आहे. भाषांतरकारानें वाचकांच्या सोयीसाठीं या लेखांत क्वचित् लहान सहान फेरफार केले आहेत.

माणसाची अशी स्थिति होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. मला तुझ्या दुःखाची पूर्ण कल्पना आहे. तूं व तुझ्यासारखा दुःखाचा डोंगर ज्यांच्या-वर कोसळला आहे अशीं दुसरीं माणसें, यांविषयीं माझ्या मनांत खरीखुरी सहानुभूति आहे. पण कोरडी सहानभूति दाखवून स्वस्थ बसण्याची माझी इच्छा नाहीं. तुम्हांला थोडीतरी मदत करून तुमचें दुःख हलकें करीन अशी मला उमेद आहे. तुमच्यासारख्या हजारों शोकमग्न लोकांस अशी मदत होऊन त्यांचें दुःख हलकें झालें आहे; तर तुमचेंच तेवढें हलकें कां होणार नाहीं ?

मित्रा, यावर मला तूं सहजच विचारशील कीं माझा व त्या मृत मनुष्याचा वियोग झाला आहे ही गोष्ट जर खरी, तर तो मृत मनुष्य मला परत मिळाल्याशिवाय तुम्ही मला मदत ती कशी करणार ?

मला तुझ्या मानसिक स्थितीची बरोबर कल्पना आहे, पण क्षणभर धीर धरून मी आतां ज्या दोन तीन गोष्टी तुला सांगणार आहें त्या समजून घेण्याचा प्रयत्न कर. प्रथम फक्त त्यांचें मी दिग्दर्शन करतों आणि मागाहून तुला त्या गोष्टी विस्तारानें सांगेन म्हणजे तुझी खात्री पटेल. त्या गोष्टी अशाः--

१ आपली हानि झाली आहे असें जें तुह्मी दुःखमग्न माणसें ह्मणतां तें तुमच्या दृष्टीनें खरें असेल पण ती हानि खरी नाहीं. मृत्यूकडे दुसऱ्या एका दृष्टीनें तुह्मी पहा; कारण तुमचें दुःख हें तुमच्या सृष्टिविषयक अज्ञानाचा परिणाम होय. कित्येक साध्या गोष्टी तुमच्यापुढें मांडून वस्तुस्थिति काय आहे हें तुम्हांस समजावून सांगण्याचा मी येथें प्रयत्न करणार आहें. त्याविषयीं अधिक विचार तुम्हांस यथावकाश करितां येईल.

२. आपणास सोडून गेलेल्या प्रिय माणसाचें काय झालें असेल कोण जाणे, अशी शंका येऊन त्याबद्दल फिकीर करण्याचें तुम्हांला बिलकुल कारण नाहीं. कारण मरणोत्तर स्थिति काय असते याचा आतां नीट उलगडा झालेला आहे. भुवर्लोकाचा शोध होऊन त्याची शास्त्रीय दृष्टीनें

छाननी झाली आहे. आपल्या या भूलोकाचे नियम जसे ठरलेले आहेत तसेच भुवर्लोकाचेहि ठरीव सृष्टिनियम आहेत.

३. तुमच्या शोकामुळें मृतजीवास त्रास होतो म्हणून तुम्हांला शोक करतां कामा नये; आणि एकदां तुम्हांस वस्तुस्थिति उमजली म्हणजे तुम्ही शोक करणारहि नाहीं.

तुम्हीं म्हणाल हा पोकळ वेदान्त आहे. मी तुम्हांस उलट विचारतों आजचे जे तुमचे विचार आहेत त्यांना तरी आधार काय आहे ? आमच्या विचारांस आमच्या धर्माचा आधार आहे असें तुह्मी सांगाल, किंवा तुह्मी ह्मणाल कीं आम्हीं म्हणतों तें अमुक अमुक धर्मग्रंथांत लिहिलेलें आहे किंवा सभोंवतालच्या बहुजनसमाजाचें तें मत आहे. परंतु तुह्मी जर पूर्वग्रह सोडून द्याल तर तुम्हांसही आढळून येईल कीं तुमचें जें हल्लींचें मत आहे त्यासही चांगलासा आधार नसून तोही पोकळ वेदान्तच आहे. कारण निरनिराळ्या धर्मांची आणि त्यांतील पंथांची शिकवण भिन्नभिन्न असून धर्मग्रंथावरील भाष्यकार जर पाहिले तर एक एक अर्थ करतो, दुसरा भलताच करतो व तुम्ही आम्ही कदाचित् तिसराच कांहींतरी करूं, अशी स्थिति आहे. आजच्या प्रचलित मतास अनुभविक ज्ञानाचा आधार नसून तें सांगोसांगी किंवा परंपरेनें चालत आलेलें आहे. पण आपल्या मनावर अत्यंत मोठा परिणाम करणाऱ्या मृत्युविषयक दुःखासारख्या गोष्टी इतक्या महत्त्वाच्या आहेत कीं, त्यांच्याबद्दल ‘ मला असें वाटतें ’ असें नुसतें म्हणून किंवा योग्य आधाराशिवाय कांहीं तरी मत बनवून स्वस्थ बसणें उपयोगी नाहीं. असल्या गोष्टींचें शास्त्रीय पद्धतीनें आणि बिनचूक संशोधन झालें पाहिजे, आणि त्याचा तपशीलही भौतिक शास्त्रांच्या गोष्टींप्रमाणें व्यवस्थित रीतीनें मांडण्यांत आला पाहिजे. तरच माणसाची असल्या गोष्टींविषयीं खात्री पटेल. अशा प्रकारचें संशोधन झालेलें आहे व त्याचा तपशीलही शास्त्रीय रीतीनें मांडण्यांत आलेला आहे. मी जें काय आतां तुम्हांला सांगणार आहें तें या पद्धतीचेंच फळ आहे. मला अंधश्रद्धा

नको आहे. स्वतः प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी मी तुम्हांस सांगत असून तुम्हीं त्यांची चवकशी करावी अशी माझी इच्छा आहे.

आतां ह्या वरील गोष्टी एक एक घेऊन त्यांचा वेगवेगळा विचार करूं. हा विषय तुम्हांस स्पष्टपणें समजावा म्हणून मनुष्याच्या रचनेबद्दल सामान्यतः लोकांस माहिती असते त्यापेक्षां थोडी जास्त माहिती येथें तुम्हांस सांगितली पाहिजे. कारण या विषयाचा ज्यांनीं विशेष अभ्यास केलेला नसतो त्यांचें या बाबतींतील ज्ञान तितपतच असतें. मनुष्याचें शरीर नष्ट झाल्यावर अविनाशी असें कांहीं तरी तत्त्व शिल्लक रहातें असें लोक म्हणत असतात. या म्हणण्यांत कांहीं तथ्य असेल. पण त्यांत स्पष्ट असें कांहींच नाहीं व वस्तुस्थितीचाही पुरेसा उल्लेख नाहीं. असला संदिग्धपणा टाकून दिला पाहिजे. ‘ मला आत्मा आहेसें वाटतें ’ असे संशयित शब्द बोलण्याऐवजीं ‘ मी आत्मा आहें’ असें विधान माणसानें ज्ञानपूर्वक करावयास पाहिजे. वस्तुस्थितिही अशीच आहे. मनुष्य हा आत्मा आहे व त्या आत्म्यानें शरीर धारण केलेलें असतें. मनुष्य म्हणजे त्याचें शरीर नव्हे, तें त्यानें परिधान केलेलें वस्त्र होय; हें वस्त्र जीर्ण होऊन गळून पडलें म्हणजे मृत्यु आला असें आपण म्हणतों. माणसाच्या अंगांतला अंगरखा काढिला म्हणजे त्याचा ज्याप्रमाणें अंत होत नाहीं तद्वत मृत्यु आला म्हणजे माणसाचा अंत होत नाहीं. तेव्हां तुमचा मित्र मेला म्हणजे तो नाहींसा झाला असें होत नाहीं. जो कोट घातलेला तुम्हीं त्याला नेहमीं पहात होतां तो कोट तुम्हांस आतां दिसत नाहीं इतकाच त्याचा अर्थ आहे. कोट गेला तरी कोट घालणारा मनुष्य शाबूद आहे. तुमचें प्रेम त्या कोटावर नव्हतें, त्या माणसावर होतें.

तुमचा मित्र हल्लीं कोणत्या स्थितींत आहे हें समजून घेण्यापूर्वी तुम्हीं स्वतः कोणत्या स्थितींत आहां हें प्रथम तुम्हांस समजून घेतलें पाहिजे. ‘ तुम्ही परमेश्वराचे अंश असल्यामुळें अमर आहां आणि ज्याला

तुम्हीं हें आपलें शरीर म्हणतां तें देहरूपी वस्त्र परिधान करण्यापूर्वी हजारों वर्षें तुम्हीं अस्तित्वांत होतां आणि हें शरीर नष्ट झाल्यानंतरहि हजारों वर्षें तुम्ही अस्तित्वांत रहाल ही गोष्ट ध्यानीं आणा. " आपल्या शाश्वत स्वरूपाचें प्रतिबिंब म्हणून परमेश्वरानें मनुष्यास निर्माण केलेला आहे. ही नुसती कविकल्पना किंवा श्रद्धा नसून ती शास्त्रीय पद्धतीनें सिद्ध झालेली गोष्ट आहे, व अभ्यास करण्याची तुमची तयारी असल्यास त्याबद्दलचा पुरावा या विषयावरील वाङ्मयांत तुम्हांस पहावयास मिळेल; ( या पुस्तकाच्या शेवटीं यादी जोडलेली आहे ती पहा. ) आपलें आयुष्य म्हणून जें तुम्ही म्हणतां तें आत्म्याच्या समग्र आयुष्याच्या दृष्टीनें पाहिलें तर वास्तविक एका दिवसासारखें होय, व तीच गोष्ट तुमच्या मृतमाणसास लागू आहे. म्हणून मी म्हणतों कीं तुमचा मित्र खरोखरी मेलेला नसून त्यानें फक्त शरीररूपी वस्त्राचा त्याग केला आहे.

पण असें झालें म्हणजे तो आतां केवळ शरीरविरहित प्राण झाला, पूर्वीचें त्याचें व्यक्तिवैशिष्ट्य कोणत्याहि रीतीनें कमी झालें, असें मात्र नाहीं. सेंटपॉलनें शेंकडों वर्षांपूर्वींच म्हटलें आहे " माणसाला एक पार्थिव शरीर असतें व दुसरें दिव्य शरीर असतें. " या त्याच्या म्हणण्याचा लोक भलताच अर्थ करतात आणि या घटिकेस सुद्धां हीं दोनही शरीरें आपणा सर्वांस आहेत हें त्यांस कळत नाहीं. त्यांची अशी समजूत असते कीं, पार्थिव शरीर नष्ट झाल्यानंतर दिव्य शरीर उत्पन्न होतें. तुम्ही आतां हें पुस्तक वाचीत असतांना तुमचें हें एक दृश्य जड शरीर आहे आणि दुसरें आणखी एक अदृश्य शरीर आहे आणि त्यालाच पॉलनें दिव्य शरीर असें म्हटलें आहे; आणि जेव्हां हें जड शरीर नष्ट होतें तेव्हां तें दुसरें जास्त सूक्ष्म शरीर कायम असतेंच. पार्थिव शरीरास आपण जर वरचा कोट म्हटलें तर या दिव्य शरीरास

कोटाच्या आंत असलेला ( पण घरांत घालण्याचा ) सदरा असें नांव शोभण्यासारखें आहे.'

ही विचारसरणी नीट समजून घेतल्यावर आतां आपण आणखी पुढें जाऊं. तुम्ही ज्याला मृत्यु म्हणतां त्यावेळींच कायतो आपला हा शरीररूपी कोट बाजूस होतो असें नाहीं; तर दररोज रात्रीं जेव्हां तुम्ही झोंपीं जातां तेव्हां थोडा वेळ तो बाजूस ठेवून आपल्या दिव्य ( सूक्ष्म ) शरीराच्या द्वारें तुम्हीं जगांत परिभ्रमण करतां. अशा वेळीं या जड सृष्टींत वावरणाऱ्या लोकांस जरी तें तुमचें दिव्य शरीर दिसत नाहीं तरी जे तुमचे मित्र त्याच वेळीं या दिव्य शरीरानें वावरत असतात त्यांना तें अगदीं स्पष्ट दिसत असतें. कारण प्रत्येक शरीर ज्या भूमिकेचें असेल त्या भूमिकेवरील पदार्थ त्या शरीराच्या द्वारां मनुष्यास दिसतात. जसें जड शरीरानें इतर जड पदार्थ दिसतात, तद्वतच तुमच्या दिव्य शरीरानें तुम्हांला फक्त इतरांचीं दिव्य शरीरेंच कायतीं दिसतात. जेव्हां तुम्हीं आपला कोट पुनः अंगांत घालतां, म्हणजे जागे होऊन या जड सृष्टीची जेव्हां तुम्हांस पुन्हां जाणीव येते, तेव्हां कधीं कधीं तुम्हांस झोंपेंत पाहिलेल्या गोष्टींचें स्मरण होतें, ( आतां बहुतेक वेळां हें स्मरण पुष्कळसें विपर्यस्त असतें ही गोष्ट वेगळी, ) आणि त्यास तुम्हीं 'स्वप्न पडलें' असें म्हणतां. एवंच झोंप म्हणजे तात्पुरतें मरणच झालें म्हणावयाचें. फरक इतकाच कीं, झोंपेंत जड शरीराशीं तुम्ही थोडा संबंध ठेवितां यामुळें जागे होऊन तुम्हांस तेथें पूर्ववत् येतां येतें. परंतु मेल्यानंतर मात्र तें शक्य नसतें. यावरून असें झालें

---

टीप—स्थूल शरीराशिवाय मनुष्यास सूक्ष्म शरीर असतें हें हिंदु धर्मांत सांगितलेलें आहे. वेदान्तांत मनुष्यास अनेक कोष असतात असें सांगण्यांत येतें व यांपैकीं अन्नमय कोषाखेरीज बाकीचे कोष सूक्ष्म द्रव्याचे अतएव अदृश्य असतात, या विषयाचा सविस्तर विचार आत्मविद्येचीं मूलतत्त्वें या पुस्तकाच्या पांचव्या प्रकरणांत वाचकांस सांपडेल.

—भाषांतरकार.

कीं तुमचा प्रिय मित्र ज्या स्थितींत गेला आहे तेथें तुम्ही झोंपेंत प्रत्यहीं जातां. ती स्थिति कशी असते हें तुम्हांस आतां स्पष्ट करून सांगतों.

मेल्यानंतरची स्थिति काय असते याबद्दल बरींच मतें प्रचलित आहेत. परंतु त्यांपैकीं बहुतेकांस कांहीं आधार नसून त्यांची उभारणी प्राचीन धर्मग्रंथांच्या चुकीच्या अर्थावर झालेली आहे. धर्मशास्त्र शिकविणारे लोक मरणोत्तर स्थितीचा आपणांस प्रत्यक्ष अनुभव आहे असें म्हणत नसून फक्त ऐकींव माहिती सांगत असतात. पण अशानें आपलें समाधान कसें व्हावें ? अंधश्रद्धेचा काल आतां राहिला नाहीं. आपण शास्त्रीय पुराव्याच्या कसोटीस उतरणाऱ्या ज्ञानाच्या युगांत असल्यामुळें बुद्धीस न पटणाऱ्या व सारासार विचारास सोडून असलेल्या कल्पना आपणांस इतःपर पटणें शक्य नाहीं. पूर्वीं जे सिद्धांत केवळ धर्मशास्त्रांत गोंवले होते त्यांचा माणसानें आज सूक्ष्मदृष्टीनें अभ्यास करण्यासाठीं शास्त्रीय पद्धतीचा अवलंब कां करूं नये हें मला तरी समजत नाहीं. थिऑसॉफिकल सोसायटी व सायकिकल रिसर्च सोसायटी या दोन्ही संस्थांनीं अशा शास्त्रीय पद्धतीचा अंगिकार केला आहे आणि अशा शोधांत जें कांहीं निष्पन्न झालें आहे तेंच मी आतां आपल्यास सादर करीत आहें.

आपण जीव आहोंत पण आपलें वास्तव्य जडसृष्टींत आहे. या जडसृष्टीचेंही आपल्यास पुरेसें ज्ञान नाहीं. या जडसृष्टीची आपल्यास जी माहिती होते ती सर्व आपल्या इंद्रियांच्या द्वारानें मिळते आणि ह्या इंद्रियांचा तर अद्याप कितीतरी विकास व्हावयाचा आहे. आपणास घन पदार्थ दिसतात. प्रवाही पदार्थहि अत्यंत स्वच्छ नसले तर दिसतात. परंतु बरेचसे वायू आपणांस दिसूं शकत नाहींत. अत्यंत विरल वायूपेक्षांहि फार सूक्ष्म असणारे असे द्रव्याचे दुसरे प्रकार आहेत हें संशोधनानें सिद्ध झालें आहे. परंतु आपल्या जडदेहाच्या इंद्रियांवर त्यांचा परिणाम होत नाहीं आणि त्यामुळें त्या इंद्रियांच्या साह्यानें त्यांचें आपल्यास कांहींही ज्ञान होत नाहीं.

पण त्यांचें ज्ञान होणें अशक्य कोटींतलें आहे असें मात्र नाहीं. दिव्य शरीर म्हणून जें वर सांगितलें त्यालाहि या जड शरीराप्रमाणें इंद्रियें असतात. त्या इंद्रियांच्याद्वारा त्या द्रव्यांचें संशोधन माणसास करतां येतें. बहुतेक लोकांचीं हीं दिव्य शरीरांचीं इंद्रियें सांप्रत कार्यक्षम झालेलीं नाहींत. परंतु मनुष्यास तीं कार्यक्षम करतां येतात. आज कित्येकांनीं तीं कार्यक्षम केलेलीं आहेत. ज्यांस ही शक्ति प्राप्त झालेली आहे त्यांस सामान्य माणसास न दिसणाऱ्या अशा पुष्कळ गोष्टी दिसूं शकतात. या जगांत पुष्कळ अद्भुत गोष्टी आहेत हें त्यास समजून येतें. या जगांत मनुष्य प्राणी जरी हजारों वर्षें रहात आलेला आहे तरी बहुतेक मनुष्यांस आपल्या जीविताच्या उच्च व आनंददायक स्वरूपाची अद्याप यत्किंचित्‌हि ओळख झालेली नाहीं. ह्या रीतीनें संशोधन करून पुष्कळच नवल वाटण्यासारख्या गोष्टी प्रत्ययास आलेल्या आहेत आणि प्रत्यहीं नव्या नव्या गोष्टींचा उलगडा होत आहे. ही माहिती आत्मविद्येच्या वाङ्मयांत पाहण्यास सांपडेल; परंतु येथें माणसाची मरणोत्तर स्थिति काय असते या एकाच बाबतींतील नव्या माहितीचा आपणास विचार कर्तव्य आहे.

पहिली गोष्ट ध्यानांत ठेवण्याची ती ही कीं, मरण म्हणजे मनुष्याचा आत्यंतिक नाश असें जें आपण अज्ञपणामुळें समजत होतों तशांतला कांहीं प्रकार नसून, जीवित्वाची एक अवस्था सोडून दुसऱ्या अवस्थेंत जाणें, या स्थित्यंतरासच मृत्यु ही संज्ञा आहे. मीं वर सांगितलेंच आहे कीं, मृत्यु म्हणजे कोट काढून ठेवण्यासारखें आहे. पण मेल्यानंतरही आंतल्या सदऱ्यासारखें प्रावरण—दिव्य शरीर—माणसास असतेंच. विरल द्रव्याचें तें शरीर असल्यामुळें कांहीं ग्रंथांत त्यास जरी दिव्य हें विशेषण दिलें तरी तें शरीर द्रव्याचेंच बनलेलें असतें. आतां हें खरें कीं, ज्या द्रव्याचें तें बनलेलें असतें तें द्रव्य आपल्या परिचयाच्या कोणत्याही द्रव्यापेक्षां फारच सूक्ष्म असतें. भूलोकाशीं व्यवहार करण्याचें साधन एवढाच काय तो जीवात्म्यास स्थूल शरीराचा उपयोग असतो. स्थूल शरीर नसतें तर जीवात्म्यास बाह्य जगाशीं व्यवहार करतां आला नसता. जीवात्म्याचा

बाह्य जगाशीं व्यवहार म्हणजे त्यानें आपलें कर्तृत्व जगास दाखविणें व उलट जगाच्या व्यवहाराची आपण जाणीव करून घेणें हा होय. दिव्य शरीराचाहि अगदीं स्थूल शरीराप्रमाणेंच उपयोग आहे. जीवात्मा त्याच्या द्वारानें भुवर्लोकांत व्यवहार करितो. पण हा भुवर्लोक म्हणजे अगदीं दूरचा व अगम्य असा दुसरा कांहीं लोक नसून, हल्लीं ज्या भूलोकांत आपण आहों त्या भूलोकाचाच सूक्ष्मतर भाग आहे. सृष्टींत एकाहून एक सूक्ष्म असे अनेक लोक आहेत. पण या लोकांपैकीं उच्चतर लोकांशीं मेलेल्या माणसास कांहीं कर्तव्य नसतें, व मृत्यूनें झालेल्या स्थित्यंतराशीं या उच्च लोकांचा संबंध येत नाहीं. कोणी म्हणेल कीं हें अवस्थांतर झाल्यावर आपल्या चर्मचक्षूंस तो मनुष्य दिसत नाहीं; पण जरा विचार केला तर आपल्यास कळेल कीं, खरा मनुष्य हा आपणांस केव्हांच दिसत नसून त्याचें स्थूल शरीर कायतेंच आपणास दिसत असतें. मेल्यानंतर तो मनुष्य सूक्ष्म अशा देहांत राहातो. हा देह तुमच्या चर्मचक्षूंस दिसला नाहीं तरी तो तुम्हांस कधींच दिसणें शक्य नाहीं असें मात्र नव्हे.

तेव्हां पहिली गोष्ट तुमच्या मनांत ठसावयास पाहिजे ती ही कीं, मेलेलीं माणसें आपणांस सोडून दूरवर कोठें जात नाहींत. मनुष्याचें मरण म्हणजे एक अद्भुत चमत्कार आहे. मनुष्य मेला म्हणजे तो चुटकीसरसा आकाशस्थ ताऱ्यांच्या पलीकडे कोठें तरी स्वर्गांत गडप होत असतो अशी माणसाची लहानपणापासून समजूत करून दिलेली असते. येवढ्या अवाढव्य अंतरावर जाण्यास त्यास साधन काय असतें याचा मात्र कोणी उलगडा करीत नाहीं. असल्या घोंटाळ्याच्या समजुतींत आपण वाढलों आहों. सृष्टीचे मार्ग अद्भुत असतात, व ते समजून घेतांना माणसाचा घोंटाळा होऊं शकतो हें खरें. पण सृष्टीच्या मार्गांवर तर्कशास्त्र व सारासार विचार यांस रजा दिलेली नसते हेंही खरें आहे. आपल्या घरांत उभे राहून तुम्हीं आंगांत घातलेला कोट काढून टाकलात कीं एकाद्या दूरच्या पर्वतशिखरावर तुम्ही जाऊन पोहोंचलांत असें होत नाहीं; तुम्हीं पूर्वीं

होतां तेथेंच असतां, फरक काय तो तुमच्या बाह्य स्वरूपांत होतो, तद्वतच मनुष्य जेव्हां आपला स्थूल देह टाकून देतो तेव्हां तो पूर्वी असलेल्या ठिकाणींच असतो. तो तुम्हांस न दिसण्याचें खरें कारण तो लांब कोठें तरी गेला हें नसून त्याचें आतांचें बाह्य वेष्टन ( शरीर ) तुमच्या चर्मचक्षूंस दिसत नाहीं हें होय.

निसर्गांत असणारीं सर्व आंदोलनें आपल्या डोळ्यांवर परिणाम करीत नसून त्यांतील अगदीं थोडीं परिणाम करूं शकतात. हीं परिणाम करणारीं आंदोलनें ज्या पदार्थापासून परावर्तन पावतात तेवढेच पदार्थ आपल्या डोळ्यांस दिसतात ही गोष्ट आपल्यास माहीत आहेच. दिव्य शरीर दिसणें न दिसणें ही गोष्ट सुद्धां त्या आंदोलनांचा तुमच्या डोळ्यांवर परिणाम होणें किंवा न होणें यावरच अवलंबून आहे. हीं आंदोलनें बऱ्याचशा विरल द्रव्यापासून उत्पन्न होत असल्यामुळें त्यांची जात अगदीं वेगळ्या तऱ्हेची असते. या विषयाची तुम्हांस जर आवड असेल तर त्याची इत्थंभूत माहिती तुम्हांस थिऑसफीच्या वाङ्मयांत वाचण्यास सांपडेल.

तूर्त आपणास एवढेंच लक्षांत ठेवावयाचें कीं आपल्या स्थूल शरीराच्या सहाय्यानें आपणास फक्त भूलोकांतीलच पदार्थ दिसतात, व फक्त त्यांसच आपल्यास स्थूल शरीरानें स्पर्श करितां येतो. आपल्या दिव्य शरीराच्या सहाय्यानें आपल्यास भुवर्लोकांतील पदार्थ दिसतात व त्यांस स्पर्शही करितां येतो. हा भुवर्लोक म्हणजे वेगळाच कांहीं लोक नसून या लोकाचाच जास्त सूक्ष्म असा भाग आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. या भुवर्लोकाशिवाय आणखी इतर लोक अस्तित्वांत आहेत हें मीं पूर्वी सांगितलें आहे आणि पुनःही सांगतों. पण त्या लोकांशीं आपल्यास तूर्त कांहीं कर्तव्य नाहीं. ज्यास तुम्हीं मेला असें समजतां तो मनुष्य वास्तविक तुमच्या जवळच असतो. तुम्हीं आपल्या स्थूल शरीरांत असतां व तो आपल्या दिव्य शरीरांत असतो. दोघे जवळ जवळ असलात तरी तुमच्या स्थूल दृष्टीस तो दिसत नसल्यामुळें तो जवळ असूनही तुम्हांस त्याचें अस्तित्व समजत

नाहीं. परंतु तुम्हीं झोंपेंत हें स्थूल शरीर बाजूस सारलेंत म्हणजे तो व तुम्ही एकत्र येतां, बुद्धिपुरस्सर व्यवहार करतां, व जशी पूर्वीं तुमची एके ठिकाणीं भेट होत होती तशीच भेट होते. एवंच त्या मृत माणसावर तुमचें प्रेम असल्यास झोंपेंत तुम्हांला त्याच्या भेटीचें सुख मिळतें. फक्त जागृत अवस्थेंत काय तो त्याचा वियोग झालासा वाटतो.

दुर्दैवानें आपली बहुतेकांची स्थूल शरीरांतील जाणीव व दिव्य शरीरांतील जाणीव यांमधील दुवा सांधला नसल्यामुळें दिव्य शरीरानें आपण वावरत असतां जरी आपणांस आपल्या स्थूल शरीराचें भान असतें तरी निद्रावस्थेंत स्थूल शरीरापासून दूर असतां जीवात्मा काय करितो याची स्मृति जागृतावस्थेंत पुष्कळांस आणतां येणें शक्य नसतें. ही आपली स्मृति जर अखंड असती तर मृत्यु म्हणजे काय याची आपणांस कल्पनाही झाली नसती. कांहीं लोकांची ही दोनी तऱ्हेची जाणीव हल्लींच सांधलेली आहे व जिवात्म्याच्या नैसर्गिक शक्तींच्या विकासाचीच ती एक पायरी असल्यामुळें बाकीच्यांचीहि ती यथावकाश स्थिति येईल. पुष्कळांच्या बाब्तींत अशा विकासास यापूर्वींच प्रारंभ झालेला आहे व निद्रावस्थेंतील अनुभवाची त्यांस अंधुक स्मृतिहि असते. परंतु अशा अनुभवांस केवळ कांहीं तरी स्वप्न असें समजून कोणी त्यांस महत्त्व देत नाहीं. ज्यांनीं स्वप्नशास्त्राचा अभ्यास केलेला नाहीं त्यांस स्वप्न म्हणजे वास्तविक काय अवस्था असते हें कळतच नसतें. म्हणून ते स्वप्नांस कवडीमोल समजतात. हल्लींच्या काळांत दिव्य दृष्टि व दिव्यानुभवाची अखंड जाणीव ही थोड्याच इसमांस आहे, पण ज्यांस मृत माणसें दिसलीं नाहींत तरी त्यांचें सान्निध्य भासतें असे मात्र हल्लीं पुष्कळ लोक आहेत व दुसरे असेहि आहेत कीं, त्यांस निद्रावस्थेंतील अनुभवांची बिनचुक आठवण रहात नाहीं, पण निजून उठल्यावर त्यांच्या चित्तवृत्तीस एक प्रकारची शांतता व प्रसन्नता वाटते. ही वृत्ति म्हणजे दुसरें कांहीं नसून सूक्ष्मलोकांत घडून आलेल्या गोष्टींचा जागृतावस्थेंत आल्यावरहि कायम राहिलेला परिणाम होय.

भुवर्लोक हा भूलोकापेक्षां मोठा असून त्यास व्यापून उरलेला आहे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. भुवर्लोकांत ( निद्रावस्थेंत ) असतां या भूलोकांत ( जागृतावस्थेंत ) घडून आलेल्या गोष्टींचें माणसास स्मरण असतें; परंतु जागें झाल्यानंतर निद्रावस्थेंतील अनुभवाचें तसें स्मरण रहात नाहीं याचें कारण निद्रावस्थेंत जाते वेळीं या जड देहाचें आवरण तुम्हीं बाजूस ठेवतां; परंतु परत जागृतावस्थेंत येतांना तें तुम्हीं पुनः आंगावर ओढून घेतां व त्यामुळें तुमच्या सूक्ष्मशक्ति त्या जड देहांतून प्रकट होऊं शकत नाहींत; व साहजिकच निद्रावस्थेंतील अनुभवाची विस्मृति होते. तेव्हां मृत स्नेह्यास तुमच्या मनांत जर कांहीं सांगावयाचें असेल तर ' मी त्याला अमूक एक गोष्ट सांगेनच सांगेन ' असा निश्चय करून झोंपीं जातांना हा निश्चय मनांत अगदीं ठाम करून तुम्हीं निजलें पाहिजे. म्हणजे निद्रावस्थेंत गेल्यानंतर तुम्ही त्यास भेटलां कीं, ती गोष्ट त्यास नेमकी सांगाल. कधीं तुम्हांस कांहीं बाबतींत मृताचा सल्ला घ्यावासा वाटेल व तो तुम्हांस मिळेलहि; मात्र अशा वेळीं वर सांगितलेल्या या दोन जाणीवेंतील सांधा जोडलेला नसल्यामुळें मृतानें दिलेला सल्ला जागृतावस्थेंत तुम्हांस नीट आठवणार नाहीं. असें झालें तरी जागे झाल्याबरोबर पुष्कळ वेळां तुम्हांस विवक्षित बाबतींत मृताची इच्छा किंवा मत काय असावें याबद्दल तुमच्या मनांत एकादी कल्पना कधीं कधीं जोरानें येत राहील. हीच कल्पना बरोबर आहे असें धरून चालण्यांत सहसा कांहीं चूक होणार नाहीं. पण हें जग सोडून मृत मनुष्य सूक्ष्म सृष्टींत गेल्यामुळें या भूलोकच्या कर्मकटकटीसंबंधानें त्यास त्रास देणें बिलकूल इष्ट नाहीं—कां तें पुढें पाहूं—व म्हणूनच अत्यंत महत्त्वाच्या बाबीशिवाय तुम्हीं त्याचा सल्ला न घेणें बरें.

आतां मेलेल्या माणसांची स्थिति कशी काय असते याबद्दल विचार करूं या. या भूलोकाप्रमाणें सूक्ष्म लोकांतहि प्रत्येकाची स्थिति निरनिराळी असते. पण एवढी गोष्ट मात्र खरी कीं, भूलोकांतील स्थितीपेक्षां ती बहुतेक सर्वांच्या बाबतींत जास्त सुखाची असते. मनुष्य मेल्याबरोबर त्याच्यांत

जमीन अस्मानाचें अंतर पडून तो लांब कोठें स्वर्गांत किंवा नरकांत निघून जातो असें नाहीं. खरें म्हटलें म्हणजे लोकांच्या जुन्या समजुतीप्रमाणें जेथें यम छळ करितो असा नरकही कोठें नाहीं. माणसानें जें स्वतः केलें असेल त्याचे त्यास परिणाम भोगावे लागतात इतकेंच. मृत्यु आल्यामुळें मनुष्यांत कांहीं फरक होऊन तो एकदम मोठा साधु किंवा देव बनतो किंवा तो सर्वज्ञ होतो असें नाहीं. तो मरणापूर्वी जसा होता तसाच अगदीं असतो. त्याच्या भावना, स्वभाव, बुद्धि यांत कांहीं बदल होत नाहीं. फरक काय तो त्याचें शरीर नष्ट झालेलें असतें हा होय.

आतां जड शरीर नष्ट झालें म्हणजे काय झालें हें बरोबर लक्षांत आणा. शरीर नसलें म्हणजे कष्ट किंवा शीण होणें शक्य नाहीं; तसेंच कंटाळवाण्या व्यवसायांतूनहि माणसाची मुक्तता होते. शरीर सुटल्यावर मनास बरें वाटेल तें करण्याची मुभा—पुष्कळांस असली मुभा जिवंतपणीं कधींच मिळलेली नसत्ये—माणसास मिळते. या मृत्युलोकीं असतांना माणसांवर नेहेमीं नियंत्रण असतें. आपणास पाहिजे असेल तें ज्यांस करतां येईल असे सुखवस्तु लोक अगदीं थोडे. बहुतेकांस अन्नवस्त्र व घरदार याकरितां सतत कष्ट करावे लागतात. चित्रकार व गवई यांच्यासारख्या थोड्याच इसमांस त्यांचे व्यवसाय आनंददायक असतात. परंतु बाकीच्या बहुतेक धंद्यांत किंवा कामांत जे कष्ट असतात ते निरुपाय म्हणूनच मनुष्य करितो.

या सूक्ष्म लोकांत पैसा, अन्नवस्त्र, घरदार यांची मुळींच जरूर लागत नाहीं. या लोकचें वैभव व सौंदर्य तेथील कोणत्याहि रहिवाशास विनामूल्य उपभोगण्यास मिळतें. मृताच्या सूक्ष्म शरीराचें द्रव्य विरल असल्यामुळें त्यास मन मानेल तसें इकडे तिकडे फिरतां येतें. वनशोभा, आकाश, समुद्रादि निसर्गकृत रमणीय दृश्यें यांची आवड असेल तर त्याच्या मनांत विचार येण्याची खोटी कीं त्यास लगेच इष्टस्थळीं जातां येतें. मनुष्य चित्रकलाप्रिय असेल तर त्यास जगांतील उत्कृष्ट चितार्‍यांच्या कलेचे सर्वोत्तम नमुने पुढें ठेवून त्यांच्यावरच सर्वकाळ तंद्री लावतां येईल. तसेंच

गायनकलेचा नाद असल्यास त्यास जगांतील उत्तमोत्तम अशा ठिकाणीं जाऊन तेथील पहिल्या प्रतीच्या गायनवादनपटूंची कला अनुभवितां येईल. मरणापूर्वीं त्यास कशाचाहि नाद असो—मात्र त्यास स्थूल देहाची अवश्यकता नसून तो उच्च भावनांचा पोषक किंवा बुद्धिविषयक असला पाहिजे—मेल्यानंतर त्या विषयास पूर्णपणें वाहून घेण्यास त्यास कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध नसतो. तर मग आतां तुमच्या पूर्णपणें ध्यानांत आलें असेल कीं सर्व सुबुद्ध व सन्मार्गी माणसें मरणापूर्वींच्यापेक्षां मरणानंतर किती तरी पटीनें जास्त सुखी असतात. याचें कारण म्हटलें म्हणजे त्यांस स्वतः प्रिय वाटणाऱ्या गोष्टींत वेळ खर्च करण्यास पूर्ण मुभा असत्ये; व आपल्या अत्यंत आवडीच्या विषयांत मनमुराद प्रगति करण्यासहि त्यास विपुल वेळ मिळतो.

यावर तुम्ही विचाराल कीं या सूक्ष्म लोकांत दुःखी लोकच नाहींत कीं काय ? नाहींत कसे ? आहेत. कारण सूक्ष्म लोकांतील आयुष्य म्हणजे या मृत्युलोकांतील आयुष्याच्या उत्तरार्धासारखें असतें व हरएक बाबतींत मनुष्य मरणापूर्वीं असतो तसाच नंतरहि असतो. जिवंत असतांना जर नीच व्यवसायांत तो गढलेला असेल तर या सूक्ष्म लोकांत तशा तऱ्हेच्या त्याच्या वासनांची तृप्ति होण्यास त्यास साधन मिळणार नाहीं. दारूबाजास दारू पिण्याची तलफ आली तरी त्याचा जड देह नष्ट झाल्यामुळें त्यास ती भागवितां येणार नाहीं. खादाड माणसास चमचमीत पक्कान्नें खावयास मिळणार नाहींत. कृपणास रुपयांची रास करतां येणार नाहीं. जिवंतपणीं ज्यानें नीच मनोविकारांचें पोषण केलें असेल त्याच्या मागें या मनोविकारांचा ससेमिरा मेल्यानंतरही राहील. विषयी माणसास विषयसुखाची इच्छा होईल परंतु ती पुरी मात्र होणार नाहीं. मत्सरग्रस्त मनुष्यास त्याच्या प्रतिस्पर्ध्याच्या कृत्यांत ढवळाढवळ करतां येत नसल्यामुळें त्यास जास्तच त्रास होईल. अशा मनुष्यांस निःसंशय क्लेश हे होतातच; पण ज्यांच्या भावना किंवा चित्तवृत्ति हलक्या प्रतीच्या असतात त्यांसच मात्र होतात,

इतरांस नव्हे. अशा माणसांचें दैव सुद्धां अगदीं त्यांच्या मुठींत असतें. त्यांनीं आपल्या ह्या वासना बदलल्या कीं त्यांच्या दुःखाचा शेवट झालाच म्हणून समजावें. नेहमीं हें लक्षांत ठेवा कीं जिवंतपणीं केलेल्या कुकर्मा-बद्दल देव नरकांत घालून शासन करतो हें म्हणणें खरें नाहीं. तर विस्तवावर पाय पडला म्हणजे तो भाजतो हा निसर्गाच्या नियमाप्रमाणें जसा परिणाम होतो तसाच दुःख हा माणसानें केलेल्या गोष्टींचा परिणाम असतो. कारण नाहींसें केलेंत कीं कार्यहि गेलेंच. तें तत्क्षणींच जाईल असें नाहीं; पण कारणामधील अंतर्गत शक्ति संपली म्हणजे कार्यही संपेल.

पुष्कळ लोक असे असतात कीं त्यांच्यांत असले विशेष वाईट प्रकारचे दुर्गुण असत नाहींत. तरीपण ते प्रपंचांत गर्क झालेले असून समाज आणि रूढि यांचेंच त्यांना विशेष महत्त्व वाटतें आणि स्वतःची चैन कशी होईल या विवंचनेंत ते असतात. अशा प्रकारच्या माणसांस सूक्ष्मलोकांत प्रत्यक्ष दुःख नसतें. पण पुष्कळ वेळां त्यांस तो लोक कंटाळवाणा वाटतो व वेळ जातां जात नाहींसा होतो. समानशील लोकांशीं त्यांस मिसळतां येतें पण त्यांस त्याचाही कंटाळा येतो. कारण असें कीं, सूक्ष्मलोकामध्यें पोषाकांत किंवा डामडौलांत एकमेकांशीं स्पर्धा करण्यास संधि नसते; जरा उच्च दर्जाचे व शहाणे सुर्ते जे असतात अशा लोकांशीं संघटण करण्याची जर त्यांस इच्छा झाली तर ती सफल होणें थोडें कठीण असतें, कारण असे लोक आपल्या निरानिराळ्या व्यवसायांत मग्न असतात. बौद्धिक किंवा ललितकलेच्या विषयांची जर कोणास आवड असेल तर या भूलोकापेक्षां सूक्ष्मलोकच त्यास शतपटीनें जास्त सुखदायक होईल आणि बौद्धिक विष-यांत प्रगति व्हावी अशी इच्छा करण्याइतकी जर त्यास अक्कल असेल तर या सूक्ष्मलोकांत तें केव्हांहि शक्य असतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

या नव्या लोकांत ललितकला आवडणारे आणि बुद्धिप्रधान असणारे लोक अत्यंत सुखी असतात. जे लोक परोपकाररत असतात ते तर यांच्यापेक्षांहि जास्त सुखी असतात. कारण असें कीं, त्या लोकांत

दारिद्य, क्षुधा, तृषा, थंडी वगैरे जरी कांहीं नसलें तरी ज्यांचें सांत्वन करतां येईल व ज्यांस शिकवितां येईल असे लोक तेथें असतातच. पाश्चात्य देशांत मरणोत्तर स्थितीसंबंधीं फार थोडें ज्ञान जनतेंत असल्यामुळें सूक्ष्मलोकांत इहलोकापेक्षां जास्त काय काय गोष्टी करतां येणें शक्य आहे याबद्दलची माहिती जरूर असणारे पुष्कळ लोक तेथें असतात आणि ह्मणूनच येथल्या-प्रमाणें तेथेंहि ज्ञात्या माणसास इष्ट तें ज्ञान लोकांस देण्यास वाव असतो. येथें आणि तेथें हे शब्द मीं नाइलाजानें योजिले आहेत. कारण वास्तविक पाहिलें असतां दिव्य लोक हा येथेंच आपल्या सभोंवतीं सर्वकाल असतो. तो कोठें दूर किंवा अगम्य आहे अशांतली गोष्ट नव्हे.

यावर असें कोणी विचारील कीं मेलेलीं माणसें आपणास पाहूं शकतात काय, आणि आपण बोलतों तें त्यांस ऐकूं येतें काय ? याचें उत्तर ते आपणास पाहातात हें आहे. पाहातात याचा अर्थ असा कीं, त्यांस आमच्या सान्निध्याची नेहेमीं जाणीव असते व आपण सुखी आहों किंवा दुःखी आहों हें त्यांस समजतें. पण आपण बोललेलें त्यांस ऐकूं येत नाहीं किंवा आपली बारीकसारीक शारीरिक हालचाल त्यांस समजून येत नाहीं. क्षणभर विचार केला तर त्यांना काय समजणें शक्य आहे तें आपल्यास अजमावतां येईल. आपण ज्यास दिव्य शरीर म्हटलें आहे त्यांत हे मृत जीव राहात असतात. हें दिव्य शरीर आपणांसही आहे, आणि दिसण्यांत तरी तें स्थूल देहाचा हुबेहूब नमुना आहे. जागेपणीं आपल्या जाणिवेचा केंद्र फक्त स्थूल शरीरांतच असतो. मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, स्थूल शरीरास ज्याप्रमाणें फक्त स्थूल द्रव्याची तेवढी जाणीव होते त्याप्रमाणें दिव्य शरीरास फक्त दिव्य सृष्टीची तेवढीच जाणीव असते. म्हणून मेलेल्या माणसास आमचें फक्त दिव्य शरीर तेवढेंच दिसतें व तें त्यास सहज ओळखतां येतें. आपण झोंपेंत असतांना आपली जाणीव त्या दिव्य शरीरांत वावरत असते आणि म्हणून मृत माणसास आपण जागे असल्या-प्रमाणेंच वाटतें. परंतु जेव्हां जागें होऊन आपली जाणीव आपण स्थूल

देहांत परत नेतों त्यावेळीं त्यास आपण झोंपीं गेलों असें वाटतें. कारण तो आपणांस पहात असला तरी त्यावेळीं त्याजकडे आपलें लक्ष नसतें व त्याजबरोबर आपणांस कोणत्याहि तऱ्हेचा संबंध ठेवतां येत नाहीं. आपला एकादा जिवंत मित्र निजलेला असला तर त्याच्या सान्निध्याची आपल्यास जाणीव असते, पण तो निजलेला असेपर्यंत त्याजबरोबर कोणत्याहि तऱ्हेचा व्यवहार करतां येत नाहीं. जिवंत मनुष्य जागा असतांना मेलेल्या माणसास त्याच्यासंबंधानें हुबेहूब असेंच वाटतें. आपण झोंपेंत असतांना पाहिलेल्या गोष्टी आपणास जागेपणीं बहुधा आठवत नसल्यामुळें आपल्या मृत माणसांची आणि आपली कायमची ताटातूट झाली अशी आपली खोटीच समजूत झालेली असते. पण मेलेले इसम आपणांस नेहेमीं पाहात असल्यामुळें त्यांस मात्र तसें वाटत नाहीं. त्यांस फरक वाटतो तो हाच कीं, रात्रीं आपण त्यांजबरोबर असतों आणि दिवसा त्यांजपासून दूर असतों. अर्थात ते जिवंत असतांना याच्या अगदीं उलट स्थिति होती.

कांहीं ग्रंथांच्या परिभाषेनुसार आपण ज्यास आतांपर्यंत दिव्य शरीर म्हणत आलों त्यास आम्ही वासनादेह असें नांव बहुशः देत असतों. त्यालाच इंग्रजींत Astral Body असें म्हणतात; त्या शरीरांत वासना व मनोविकार हे व्यक्त होत असतात. अर्थात मृतास या भावना अगदीं स्पष्ट दिसतात. आपल्यास आनंद झाल्यास तो त्यांस लगेच कळतो; परंतु त्यांस त्याचें कारण मात्र कळतेंच असें नाहीं. आपण खिन्न झालों असतां तेंहि त्यांस तात्काल समजतें आणि खिन्नतेचें कारण त्यांस समजलें नाहीं तरी त्यांत ते वांटेकरी होतात. ही सर्व आपल्या जागृतावस्थेंतील गोष्ट झाली. पण झोंपीं गेल्यावर जिवंतपणीं जसे ते आपल्याशीं बोलत असत तसेच ते आपल्याशीं मोकळेपणानें बोलूं शकतात. जिवंतपणीं आपणास आपले मनोविकार लपवितां येतात, पण भूवर्लोकांत तें शक्य नसतें; कारण प्रत्येक भावना तेथें दृश्य होते. आपले पुष्कळसे विचार आपल्या भावनांशीं संलग्न

असल्यामुळें या विचारांपैकीं बरेचसे विचारहि लगेच मूर्तांस समजतात. परंतु शुद्ध विचार ( अमूर्त विचार ) त्यांस तेथेंही समजून येत नाहींत.

तुम्ही म्हणाल कीं आमच्या लहानपणीं स्वर्ग व नरक यांबद्दल आम्हीं जी हकीकत ऐकिली त्यांत व या तुमच्या सांगण्यांत मेळ मुळींच नाहीं. परंतु त्या तुमच्या हकीकतींना आधार म्हटला तर या वर सांगितलेल्या गोष्टीच होत. वास्तविक नरक असा कोठें नाहींच; तत्रापि दारूबाज किंवा विषयी मनुष्य यांनीं आपल्या वर्तनानें अशी परिस्थिति निर्माण केलेली असते कीं तीस नरकाची उपमा अगदींच वावगी होणार नाहीं. ती परिस्थिति कायम टिकणारी नसते. तुम्ही विचाराल, तर मग ती परिस्थिति किती काळपर्यंत टिकते ? त्याचें उत्तर असें कीं, त्या वाईट वासना निर्जीव झाल्या म्हणजे लगेच त्या परिस्थितीचाही शेवट होतो. त्या परिस्थितीची कालमर्यादा ज्याची त्यास ठरवितां येत असते. मात्र त्या वाईट वासना आपल्या ताब्यांत ठेवण्याइतकी माणसास अक्कल असून त्यास तितका दृढ निश्चय असला पाहिजे. वाईट गुण जे असतात तज्जन्य दुःख मरणोत्तर भोगून नष्ट झाल्याशिवाय स्वर्गीय सुख उपभोगण्यास मिळत नाहीं.

यापेक्षांहि श्रेष्ठ दर्जाचा असा मरणोत्तर स्थितीचा दुसरा भाग आहे आणि त्याचें ( शहाण्या माणसांच्या ) स्वर्गाविषयींच्या कल्पनेशीं पुष्कळसें साम्य आहे. हलक्या प्रतीच्या आणि स्वार्थमूलक सर्व इच्छा अगदीं समूळ नष्ट झाल्यानंतर या पायरीवर मनुष्य पोंचतो. तो या स्थितीप्रत पोंहोंचल्यानंतर जिवंतपणीं ज्या दिशेनें मनुष्याच्या मनःप्रवृत्तीचा झरा वहालेला असेल त्याप्रमाणें धार्मिक परमानंदांत किंवा बुद्धिविषयक एकाद्या उच्च दर्जाच्या

---

१ मनुष्य मरणोत्तर स्वर्गलोकीं गेल्यावर त्याची तेथें जी स्थिति असते तिचें या पॅरिग्राफांत वर्णन आहे; या पूर्वींचें वर्णन भूवर्लोकांतील स्थितीचें आहे.–

भाषांतरकार.

कामांत तो गढून गेलेला असतो. हा काल ह्मटला म्हणजे त्याच्या आनंदाची परमावधि होय. कारण यावेळीं त्यास पुष्कळ जास्त गोष्टींचें आकलन करतां येतें; आणि तो आत्मस्वरूपाच्या बराच जवळ गेलेला असतो. हा आनंद फक्त धर्मनिष्ठ माणसांस मिळतो असें नसून तो सर्वांस लाभतो.

येथेंही पुनः सांगणें जरूर आहे कीं हें स्वर्गीय सुख पारितोषिक म्हणून माणसास मिळत नसून जिवंतपणीं कमावलेल्या शीलाचा तो अवश्य परिणाम होय. एकादा मनुष्य जर उच्च दर्जाचें सात्विक प्रेम व भक्ति यांनीं युक्त असेल किंवा त्याच्या बुद्धीची वाढ किंवा ललितकलेंतील प्रावण्य हीं जर वरच्या दर्जाचीं असतील तर त्याचा नैसर्गिक परिणाम म्हणजेच आम्ही म्हणतों हा आनंद होय. हें लक्षांत असूं द्या कीं जिवंतपणाचा काल व मरणोत्तर स्थिति हे एका जविनसूत्राचे दोन भाग आहेत आणि लहानपणच्या वागणुकीवर जशी माणसाच्या पुढील सर्व आयुष्यांतील परिस्थिति अवलंबून असते तद्वतच जिवंतपणीं मनुष्याची जशी वागणूक असेल त्यावर त्यापुढील भाग अवलंबून असतो. ही मरणोत्तर स्थिति कायम टिकणारी आहे य असें विचाराल तर ती तशी टिकणारी नाहीं हें पूर्वीं मीं तुम्हांस सांगितलेंच आहे. ही स्थिति म्हणजे जिवंतपणाच्या वागणुकीचा नैसर्गिक रिणाम होय आणि सान्त कारण अनन्त असा परिणाम अर्थातच उत्पन्न ं शकणार नाहीं.

मनुष्याचें जीवित हें तुम्ही मानतां त्यापेक्षां फारच दीर्घ काल टिकणारें असून जास्त थोर आहे. परमेश्वरापासून निघालेला मनुष्यरूपी स्फुलिंग त्याच ठिकाणीं पुनः परत गेला पाहिजे. आपण अद्याप परमेश्वरी पूर्णावस्थेच्या फारच दूर आहों. उत्क्रांति हा निसर्गाचा नियम असल्यामुळें सर्व प्रकारचे जीव उत्क्रान्ति पावत आहेत आणि मनुष्यप्राणीहि इतर जीवांप्रमाणेंच हळुहळु आणि एकसारखा उत्क्रांति पावत आहे. ज्याला सामान्यतः मनुष्याचा जन्म असें म्हणतात तो त्याच्या खऱ्या व दीर्घ काल टिकणाऱ्या अशा जीविताचा फक्त एक दिवस होय. ज्याप्रमाणें दररोज सकाळीं

मनुष्य निजून उठतो व कपडे चढवून आपल्या दररोजच्या कामास लागतो आणि पुनः रात्र होते तेव्हां कपडे काढून ठेवून विश्रांति घेतो आणि दुसरे दिवशीं सकाळीं पुनः उठून ताजातवाना होऊन आपलें आदल्या दिवशींचें अपुरें राहिलेलें काम पुढें चालवितो, त्याचप्रमाणें ज्यावेळीं मनुष्य या पृथ्वीवर जन्म घेऊन येतो तेव्हां तो आपल्याभोंवतीं जड देहाचें आवरण घेतो आणि त्याचें कार्य संपलें कीं तो जड देह बाजूस ठेवून--आणि यासच तुम्ही मृत्यु म्हणतां--मीं वर्णन केलेल्या विश्रांतीच्या शांततामय स्थितींत जातो आणि हा विश्रांतीचा काल संपला म्हणजे तो पुनः जड शरीर धारण करतो. अशा रीतीनें त्याच्या जीविताचा आणखी एक दिवस उजाडतो व पूर्वीं त्याच्या उत्क्रांतीची मजल जेथपर्यंत आलेली असेल तेथपासून उत्क्रांति मार्गाचें तो पुढें आक्रमण करूं लागतो आणि हें त्याचें दीर्घकालिक जीवित परमेश्वरी संकल्पाप्रमाणें त्यास देवकळा येईपर्यंत असेंच चालू राहातें.

हें सर्व तुम्हांस नवीन वाटेल व नाविन्यामुळें चमत्कारिक आणि विलक्षणहि वाटेल. पण मीं सांगितलेल्या सर्व गोष्टी सिद्ध करण्यासारख्या आहेत आणि पुष्कळ वेळां त्याचें प्रत्यंतराहि घेण्यांत आलें आहे हें लक्षांत ठेवा. हा विषय पूर्णपणें तुम्हांस समजून घ्यावयाचा असल्यास या विषयावरील वाङ्मय तुम्हांस वाचावयास पाहिजे. मृत्युविषयक दुःखाचें परिमार्जन करावें ह्या विवक्षित हेतूनं लिहिलेल्या या लहानशा पुस्तकांत मला फक्त ठोकळ गोष्टीच सांगतां येतील, त्याबद्दलचा पुरावा मांडतां येणार नाहीं.

तुम्ही कदाचित् विचाराल कीं, मागें राहिलेल्या जिवंत माणसांबद्दल मृत मनुष्यांस कांहीं काळजी वगैरे वाटते कीं नाहीं? होय, कधीं कधीं त्यांस काळजी वाटते व त्यामुळें त्यांच्या पुढील प्रगतीस अडथळाही येतो. याकरितां आपण शक्य तितका त्यांस काळजी वाटण्यासारखा प्रसंग आणूं नये. मृत माणसास जिवंतपणाच्या कसल्याहि

विचाराचा यत्किंचितही उपसर्ग न होऊं देतां ज्या स्थितींत तो गेला असेल त्या स्थितीस पूर्णपणें वाहून घेण्यास त्यास मोकळीक दिली पाहिजे. म्हणून जिवंतपणीं जे त्याचा वारंवार सल्ला विचारीत असत अशा माणसांनीं आतां स्वतः विचार करण्यास शिकलें पाहिजे. नाहीं तर जो इहलोक सोडून तो मृत मनुष्य तूर्त गेला आहे त्या लोकाविषयीं तो नंतर विचार करीत बसेल तर त्याचें इहलोकांशीं बंधन दृढ होईल. म्हणून लहान मुलांस मागें टाकून एकादा मनुष्य मेल्यास त्या मुलांची काळजी घेणें हें विशेष सत्कृत्य असतें. असें करण्यानें मनुष्य फक्त त्या मुलांचेंच कल्याण करतो असें नसून मृत माणसाची काळजी दूर करतो व त्याच्या पुढील मार्गक्रमणास सहाय्य केल्यासारखें होतें.

जिवंतपणीं एकाद्याचीं जर मूर्खपणाचीं मतें बनलेलीं असतील, ईश्वर क्रूर असून तो माणसास शिक्षा करतो असें जर त्यास शिकविलेलें असेल तर मरणोत्तर कधीं कधीं स्वतःच्या पुढील भवितव्यतेबद्दल त्यास काळजी वाटते. भुवर्लोकामध्यें अशा भ्रामक समजुतीच्या लोकांचा शोध करून त्यांस वस्तुस्थितीची तर्कशुद्ध पद्धतीनें माहिती करून देणारे पुष्कळ लोक असतात. त्यांचा हा व्यवसायच असतो. मेलेले लोकच तेथें अशा रीतीनें इतरांस मदत करतात असें नाहीं तर पुष्कळ जिवंत माणसें सुद्धां दररोज रात्रीं झोंपेंत मृतांच्या उपयोगी पडतात व तेथील खरी वस्तुस्थिति किती स्पृहणीय आहे हें सांगून त्यांची भीति व दुःख नाहींसें करण्याचा प्रयत्न करतात. सर्व दुःख अज्ञानजन्य असल्यामुळें तें अज्ञान नाहींसें केलें कीं दुःखाचा शेवट अर्थात् होतोच.

एकादें लहान मूल मेलें म्हणजे त्याच्या आईबापांची किती हृदयद्रावक स्थिति होते ! त्याचे बोबडे बोल आईबापांस ऐकूं येईनासे होतात व मुलाच्या नित्य उठण्याबसण्याच्या जागेकडे पहावें तों तेथें कांहींच नाहीं याची आठवण आली म्हणजे घर शून्यवत् भासतें. हा अपत्यवियोगही खरा नसतो. अशा मेलेल्या मुलांची भुवर्लोकांत काय स्थिति होते ? त्यांची

स्थिति सुखाची असत्ये—त्या लोकांत जाणाऱ्या सर्व लोकांमध्यें हीं मुलें सर्वांत सुखी असतात आणि त्यांस तेथें अगदीं घरच्याप्रमाणें वाटतें; आईबाप, भावंडें, खेळगडी यांपैकीं त्यांस कोणीहि दूर झालें असें वाटत नाहीं हें आपण सर्वांनीं लक्षांत असूं द्यावें. फरक इतकाच होतो कीं दिवसा-ऐवजीं रात्रीं त्यांच्याशीं त्यांस खेळण्यास मिळतें व म्हणून ते त्यांस नाहींसे झाले किंवा दूर कोठें गेले असें वाटत नाहींत. दिवसांसुद्धां त्यांस एकटें एकटें वाटत नाहीं, कारण येथल्याप्रमाणेंच तेथेंहि असलेल्या रमणीय क्रीडांगणांत मुलें एकत्र जमून खेळतात. मुलें कोणत्याना कोणत्यातरी गोष्टीं-तल्या एकाद्या व्यक्तीचें सोंग घेऊन त्या गोष्टीप्रमाणें अभिनय करण्याचा आव आणून पुष्कळदां खेळ खेळतात व करमणूक करतात. भुवर्लोकांत माणसाच्या मनांत विचार उत्पन्न झाला कीं तदनुसार आकृति दिसते आणि म्हणून एकाद्या मुलानें आपण कोणी शूर व्यक्ति आहों अशी कल्पना केली तर तेवढ्या वेळेपुरता त्यास त्या शूर व्यक्तीचा आकार प्राप्त होतो. त्यास जादूमंत्रानें जर किल्ला बांधावयाची इच्छा झाली तर त्यास तो बांधतां येतो. हाताखालीं सैन्य असावें असें मनांत येतांच तें तेथें लगेच तयार होतें आणि अशा रीतीनें मुलांच्या झुंडीच्या झुंडी आनंदांत गर्क असतात. एवढेंच नव्हे तर आनंदानें बेहोष होऊन त्यांची एकसारखी दंगल चाललेली असते.

इतर जीं निराळ्या स्वभावाचीं (धार्मिक वृत्तीचीं म्हणा) मुलें असतील त्यांस सुद्धां, इच्छेप्रमाणें, जें कांहीं पाहिजे असेल तें मिळण्यास अगदीं पंचाईत पडत नाहीं. कारण पुरातन काळचे साधुसंत, देवदूत हे नुसते कल्पनासृष्टींतले नसून ते प्रत्यक्ष असतात आणि ज्यांस त्यांची जरूरी असेल, ज्यांची त्यांजवर श्रद्धा असेल, त्यांस त्यांजकडे अचूक जातां येतें; आणि पूर्वीं कधींहि वाटले नसतील इतके ते साधुसंत, प्रेमळ व प्रतापशाली आहेत असें आतां आढळून येतें. देव भेटावा, आपणांस देव दृश्य स्वरूपांत दिसावा अशी कित्येकांची इच्छा असते. परमेश्वर सर्वव्यापी असल्यामुळें जगांतील सर्व

वस्तु त्यांचींच रूपें आहेत व त्याच्या अत्यंत क्षुल्लक लेंकराची सेवा करणें किंवा त्यांस मदत करणें म्हणजे वास्तविक त्या परमेश्वराचीच सेवा केल्याप्रमाणें किंवा त्यासच प्रत्यक्ष मदत केल्याप्रमाणें होतें अशी तेथें सुस्वभावी आणि परोपकारी लोकांची शिकवण असल्यामुळें ज्यांस प्रत्यक्ष परमेश्वराचें सगुण स्वरूपांत दर्शन व्हावें अशी इच्छा असेल त्यांचीसुद्धां निराशा होत नाहीं. पुष्कळ मुलांस दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची किंवा संकटांत असलेल्यांस धीर देण्याची आवड असते; आणि भुवर्लोकांतलि माहिती नसलेल्या लोकांस अशी मदत करण्याची त्यांस मुबलक संधि असते. प्रेमवृत्तीनें असें दयेचें कार्य करण्याकरितां मुलें त्या दिव्य प्रदेशांतून हिंडत असतात.

आणि ज्यांस खेळतांसुद्धां येत नाहीं अशा अगदीं लहान बालकांची काय स्थिति असते पहा. त्यांजबद्दल काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं. हीं मुलें जणूं आपलीं स्वतःचींच आहेत असें समजून पुष्कळ मेलेल्या आया त्यांस घेण्याकरितां व तीं केव्हां येतात याची मार्गप्रतीक्षा करीत असतात. बहुतकरून अशीं लहान मुलें भुवर्लोकांत थोडाच काळ राहून पुनः या पृथ्वीवर आणि पुष्कळ वेळां पूर्वींच्याच आईबापांच्या पोटीं जन्मास येतात.

येथपर्यंत मृतमाणसें ज्या स्थितींत असतात त्या स्थितिप्रत फक्त झोंपेंत असतांना आपल्यास जातां येईल किंवा कसें याबद्दलचा विचार झाला आणि हीच निसर्गास धरून असलेली पद्धत होय. पण परलोकविद्या (Spiritualism) नामक निसर्गास सोडून असलेली आणखीहि एक पद्धत आहे. त्या पद्धतीनें थोडा वेळ पर्यंत मेलेलीं माणसें हें पार्थीव शरीर धारण करतात आणि पुनः एकवार आपल्या चर्मचक्षूंस दिसूं लागतात. मेलेल्या माणसाच्या पुढील प्रगतीस या पद्धतीचा अंगीकार केल्यानें पुष्कळ वेळां अडथळा येतो. आणि या पद्धतींत फसवणुकीस पुष्कळच वाव असतो.

दोन कारणांमुळें अध्यात्मशास्त्राचा ( Occultism ) अभ्यास करणारीं माणसें, लोकांनीं या पद्धतीच्या नादीं लागूं नये असें म्हणतात. हा विषय

फार मोठा असल्यामुळें या लहानशा निबंधांत त्याचा विचार करतां येत नाहीं; पण माझ्या ' मरणोत्तर स्थिति ' (The Other Side of Death) या पुस्तकांत मीं त्याची सविस्तर माहिती दिली आहे. मृत माणसांचें कधीं कांहीं काम असतें व तें जिवंत माणसांनीं करावें अशी त्यांची इच्छा असते. अशा वेळीं मेलेलीं माणसें एकाएकीं या भूलोकावर परत येऊन निरनिराळ्या रीतीनें दृग्गोचर होऊं शकतात. असले प्रकार वाचकांस त्या पुस्तकांत वाचावयास सांपडतील. अशा सर्व प्रसंगीं या मृत माणसास काय पाहिजे आहे हें होईल तितकें चटकन शोधून काढून शक्य तर त्यांची इच्छा पुरी करून त्यांचें समाधान करणें हें फार बरें.

आतांपर्यंत मीं जें काय सांगितलें तें जर तुम्हांस नीट समजलें असेल तर आपल्या आप्तइष्टांच्या मृत्यूबद्दल दुःख होणें कितीही स्वाभाविक असलें तरी तें अनाठायीं दुःख होय, तसें दुःख करणें योग्य नाहीं हें तुम्हांस पटलेंच असेल. माणसानें दुःखप्रवृत्तीस अगदीं आपल्या ताब्यांत ठेवलें पाहिजे. मृतमाणसाचें चरित्र मरणोत्तर कितीतरी सुखाचें आणि व्यापक होत असतें. तेव्हां मृताच्या बद्दल शोक करण्याचें कारण नाहीं. मेलेल्या माणसाची व आपली ताटातूट झाली या कल्पित भावनेनें आपणास जर दुःख होत असेल तर पहिली गोष्ट आपण अशी समजून घेतली पाहिजे कीं वास्तविक तो आपल्यापासून दूर गेलेला नसल्यामुळें आपण काल्पनिक गोष्टीबद्दल शोक करीत आहों; आणि दुसरें असें कीं, मृताच्या खऱ्याखुऱ्या झालेल्या मोठ्या फायद्याबद्दलचा विचार न करितां आपल्या आभासिक वियोगाबद्दल आपण जास्त विचार करणें यांत अप्पलपोटेपणाचाच भाग आहे. खरें प्रेम म्हटलें तर त्यांत आपल्या स्वतःबद्दलचा यत्किंचित् सुद्धां विचार असतां कामा नये, आणि म्हणून आपण स्वार्थाचा त्याग करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या स्वतःबद्दलचा विचार सोडून देऊन म्हणजे आपणास काय वाटतें किंवा आपली काय इच्छा आहे याचा विचार न करितां मृत माणसाचें कल्याण कशांत आहे किंवा

त्याची पुढील प्रगति कशानें लवकर होईल याचा विचार आपणास केला पाहिजे.

आपण शोक केला व उदास आणि खिन्न होऊन बसलों तर मृतांच्या आनंदरूपी आकाशांत आपण काळेकुट्ट ढग उत्पन्न केल्यासारखें होतें. त्याच्यावर असा हा भयंकर परिणाम होण्याचें कारण आपणाबद्दल त्यांस वाटत असलेलें प्रेम व सहानुभूति हेंच होय. प्रेमांत शक्ति असते व आपली इच्छा असेल तर त्या शक्तीचा मृतांस अडथळा होऊं नये, उलट त्यांस आपलें सहाय्य व्हावें असें आपणांस करतां येईल. पण असें करण्यास धैर्य लागतें व स्वार्थी भावना सोडाव्या लागतात. मृत माणसास शक्य तितकी मदत करण्याची आपली इतकी उत्कट व प्रेममूलक इच्छा पाहिजे कीं तिजपुढें आपल्या स्वतःची सुद्धां आपणांस आठवण होतां कामा नये. आपला प्रत्येक विचार, आपली प्रत्येक भावना यांचें त्याच्यावर प्रतिबिंब उठत असल्यामुळें जे विचार उच्च, परोपकारी, उदात्त व सात्विक नसतील त्यांस आपण आपल्या मनांत मुळींच थारा देतां कामा नये. मृतमाणसांस आपल्याबद्दल जर कोणत्याहि तऱ्हेची काळजी वाटण्याचा संभव असेल तर आपणाबद्दल त्यांनीं मुळींच फिकीर करण्याचें कारण नाहीं अशी त्यांची खात्री व्हावी म्हणून आपण नेहमीं अगदीं उल्हास वृत्ति ठेविली पाहिजे. जिवंतपणीं मरणोत्तर स्थितीसंबंधानें जर त्यांस बरोबर व तपशीलवार माहिती नसेल तर आपण ती मिळवून, आपली आणि त्यांची रात्रीं जेव्हां भेट होते त्यावेळीं त्यांस ती समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपले विचार आणि भावना हीं त्यांच्यांत तात्काळ प्रतिबिंबित होत असल्यामुळें ते विचार आणि भावना हीं नेहमीं उच्च दर्जाचीं व त्यांस प्रोत्साहनकारक अशींच असण्याबद्दल आपण दक्ष असलें पाहिजे.

सर्व एक आहे हें ओळखण्याचा प्रयत्न करा. परमेश्वर एक असून त्याच्याठिकाणीं आपण सर्व एकरूपच आहोंत. तो केवल प्रेमरूप असून त्याच्या व्यतिरिक्त जगांत दुसरें कांहीं नाहीं हा सिद्धांत पटला म्हणजे

आपल्यास दुःख करण्याचा कधींहि प्रसंग येणार नाहीं. कारण आपण या स्थूल शरीरांत असलों काय, किंवा तें सोडून गेलों काय, आपण त्या परमात्म्याचेच अंश आहोंत आणि आपलें अस्तित्व, आपलें जीवन व आपला व्यवहार सर्व तद्रूप आहे हें फक्त आपल्यापुरतेंच नव्हे तर आपण ज्यांवर प्रेम करितों त्यांच्यासंबंधानें सुद्धां आपल्यास समजून येईल. शोक करणें हें अश्रद्धेचें व मूर्खपणाचें लक्षण होय. जसजसें आपल्यास जास्त कळूं लागेल तसतसे आपण जास्त श्रद्धावान् होऊं आणि आपण व आपले मृत सोयरेधायरे हे सर्व त्या सर्वशक्तिमान् आणि सर्वज्ञ अशा परमात्म्याचे आधीन असून आत्यंतिक प्रेमानें निगडित आहोंत ह्याचा आपल्यास पूर्ण अनुभव येईल.

ऐसा हा जाणावा । सकळात्मक देखावा ।
मग सहजें शोक आघवा । हरेल तुझा ॥ —ज्ञानेश्वरी.

[ या विषयाचा ज्यास जास्त अभ्यास करणें असेल त्यानें मराठींतील धर्मजागृतिमालेचीं पुस्तकें, विशेषतः त्या मालेंतील 'आत्मविद्येचीं मूलतत्वें' हें पुस्तक वाचावें. भगवद्गीतेंतही हा विषय आलेला आहे हें सर्वांस माहीत आहेच. इंग्रजांत आत्मविद्येच्या दृष्टीनें लिहिलेलीं पुष्कळ पुस्तकें वाचण्योजागीं आहेत. त्या पुस्तकांपैकीं प्रस्तुत ग्रंथकाराचें The Other Side of Death हें पुस्तक उत्कृष्ट आहे. तें माहितीनें भरलेलें, व विस्तृत असून अत्यंत मनोरंजक आहे. त्या पुस्तकाखेरीज प्रस्तुत ग्रंथकारानें Life after Death हें एक लहान पुस्तक लिहिलेलें आहे व तेंही वाचनीय आहे. The Astral Plane आणि The Devachanic Plane हीं या ग्रंथकाराचीं दुसरीं दोन पुस्तकें आहेत. त्यांत भुवर्लोक व स्वर्लोक याविषयींची अत्यंत पद्धतशीर माहिती असल्यामुळें मरणोत्तर स्थितीविषयीं ज्यांस नीट ज्ञान पाहिजे असेल त्यांस हीं पुस्तकें बरींच उपयोगीं पडतील. डॉ. ॲनी बेझंट यांच्या The Ancient Wisdom या पुस्तकांतही हा विषय आलेला असून त्याचें प्रतिपादनही त्यांनीं फार सुंदर रीतीनें केलेलें आहे. या विषयासंबंधीं पुरावा काय आहे हें ज्यास पहावयाचें असेल त्यानें मायर्सकृत Human Personality, स्टेडकृत Real Ghost Stories, लॅंब्रोसोकृत After Death What ? लॉजकृत Survival of Man इत्यादि अनेक पुस्तकें पहावीं. ]

त्वरा करा. त्वरा करा. धर्मजागृति मालेचे वर्गणीदार व्हा. आतां-पर्यंत मालेनें ५ पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यावर विद्वान् व मार्मिक लेखकांचे व केसरी आदिकरून वृत्तपत्रकारांचेही उत्तम अभिप्राय आले आहेत. एक रुपया वर्गणी भर-णारांस कायम वर्गणीदार होतां येतें व पुस्तकें पाऊणपट किंमतीस मिळतील.

---

## धर्मजागृति मालेचें सहावें पुस्तक.

# केवळ हिंदुधर्मासाठीं

नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. या पुस्तकाचे परिशीलनानें हिंदु-धर्माची पद्धतशीर कल्पना वाचकांस येईल. तसेंच यांत श्रीराम व श्रीकृष्ण यांचे चरित्राचें विवेचन असून त्यानें तरुण पिढीचे अंतःकरणांत प्रेम व भक्ति उत्पन्न होईल. हिंदुधर्माचे अध्ययनांत उपनिषदांचा काय दर्जा आहे याची यथातथ्य कल्पना वाचकांस पटेल. तसेंच हिंदुधर्मद्वेष्टयांनीं केलेल्या हल्लयांना व आक्षेपांना मार्मिक व सणसणीत उत्तरें या पुस्तकांत सांपडतील.

मालेचें द्वितीय पुस्तक सनातन धर्म प्रवेशाची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झालेली आहे. किंमत पूर्वीपेक्षां कमी म्हणजे डक्सन प्रतीस १ रुपया व कापडी प्रतीस १॥ रुपया.

# धर्मजागृतिमालेचीं खालील पुस्तकें

व

# इतर पुस्तकें खालील ठिकाणीं मिळतील.

पुष्प १ लें. मुमुक्षुमार्ग ... कापडी किंमत. १०१ निमकापडी किं. ०१३
पुष्प २ रें. सनातनधर्मप्रवेश...कापडी किं. १०१२ निमकापडी किं. १०८
पुष्प ३ रें. आत्मविद्येचीं मूलतत्त्वें कापडी किं. १०४ निमकापडी किं. १
पुष्प ४ थें. मेस्मेरिझम, कर्ते प्रो. रा. स. भागवत, का. किं. १॥ नि. का. किं. १।
पुष्प ५ वें. योगशास्त्र प्रवेश ... का. किं. १। नि. का. किं. १
पुष्प ६ वें. केवळ हिंदुधर्मांसाठीं. ... का. १।।। व नि. का. १।

| | | |
|---|---|---|
| १ ध्यानयोग ... ... ... ... ... | | किं. ०६ |
| २ धर्मांचे मूलसिद्धांत ... ... ... ... | | किं. ०६ |
| ३ साधनचतुष्टय ... ... | कापडी किं. ०४ | निमकापडी किं. ०२ |
| ४ जागृति–स्वप्न–सुषुप्ति ... ... ... ... | | किं. ०१ |
| ५ एक नवें तुफान ... ... ... ... ... | | किं. ०१ |
| ६ हिंदुस्तानांतील तरुण पिढी व उपनिषदें ... ... | | किं. ०२ |
| ७ डॉ० बेझंट चरित्र ... ... ... ... | | किं. ०४ |

म्यानेजर– ‘ धर्मजागृति, ’

३२१ शनवार पेठ, पुणें.